प्रेसनोट

जा.क्र. ५८१ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०८/२०१७

'' अल्पवयीन बालीका विनयभंगाचे गुन्हयात आरोपीस पाच वर्षे सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

भंडारा:– भंडरा जिल्हयातील पोलीस स्टेशन लाखनी ग्राम चान्ना (धानला) ता. लाखनी जि.भंडारा येथील तक्रारदार पिडीत बालीकेने दि. २२/०८/२०१५ रोजी रात्री ११.०० वा. सुमारास पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार दिली की, रात्री ०८.०० वा. दरम्याण विजपुरवठा खंडीत झाल्यामुळे घरातील सर्व लोक घरासमोरील रस्त्यावर बसले हाते. काही वेळाने पिडीत लहाण बहीणीसह जेवनाचे ताट बनविण्याकरीता घरात गेली. ताटे बनवीले व लहाण बहीणीला आईला जेवनाकरीता घराबाहेर बोलवीण्यास पाठवीले व पिडीत घराबाहेरच्या छपरीत वाट पाहात उभी राहीली तेव्हा आरोपी पिडीतेजवळ छपरीत आला व उद्या शाळेत जाशील का असे बोलला तेव्हा पिडीतेने त्यास बोलण्यास नकार दिला. आरोपीने पिडीतेचे हाताने तोंड दाबुन व हात पकडुन घराचे मागिल वरनीमध्ये नेवुन पिडीचेता विनय भंग केला व शरिरसुखाची मागनी केली. पिडीतेने आरडा ओरडा केला असता, पिडीतेची आई , मोठे वडील तेथे धावत आले ,अशा फिर्यादीच्या तक्रारीवरून पो.स्टे लाखनी येथे रात्री ११.१५ वाजता अप क्र. १०६/२०१५ कलम ४४८,३५४,(२) सहकलम बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ०८ अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयात तपास सहायक पोलीस निरिक्षक कमलेश सोनटक्के सध्या नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा जिल्हा भंडारा यांनी सुरू केला, व गुन्हयात आरोपी **नामे सुमेध देवदास मेश्राम वय २० वर्ष रा. चान्ना पहाडी (धानला)** यास अटक केली व तपास पुर्ण करून आरोपीविरूध्द विशेष सत्र न्यायालय भंडारा येथे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुनावनी मा. विशेष सत्र न्यायाधिश श्री पी.पी. पांडे यांचे समक्ष चालली, गुन्हयात सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता रमाकांत खत्री भंडारा यांनी येाग्य बाजु मांडली आज निांक १८/०८/२०१७ रोजी गुन्हयात मा. सत्र न्यायाधिश श्री पी.पी. पांडे यांनी, आरोपी **नामे सुमेध देवदास मेश्राम वय २० वर्षे** यास बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ कलम ०८ अन्वये दोषी ठरवुन **पाच वर्षे सश्रम कारावास व १०,०००/–रूपये दंड , दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली, कलम ४४८ भा.द.वी मध्ये एक वर्षे सश्रम कारावास व १,०००/–रुपये दंड, न भरल्यास एक महिना सश्रम कारावासची शिक्षा सुनावण्यात आली तसेच द्रव्यदंडाचीपैकी ५,०००/रु पिडीतेस नुकसान भरपाई** देण्याचा आदेश मा. सत्र न्यायाधिश श्री पी.पी. पांडे यांनी दिला. सदर गुन्हयात पोलीस नाईक सुनिल राऊत ब.न. ६३६ पो.स्टे लाखनी यांनी पैरवी अधीकारी म्हणुन कामकाज केले सहायक सरकारी अभियोक्ता रमाकांत खत्री यांनी योग्य पुरावे पडताळले.

(कृपया समोरच्या पहील्या पानावर देण्यास विनंती)

18.8.

(एस. व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.